# ग्रामपंचायत कार्यालय कळवे.

पो. कळवा, तालुका व जिल्हा ठाणे
(मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चा कलम ५२ (२) अन्वये)

ता. २२-८-८९

जा. क्र. ३५८

श्री. चाऊ शिवा पाटील

रा. पाखाडी, कळवा

**विषय :- बांधकामाची परवानगी**

संदर्भ :- आपला अर्ज व सर्व्हे नं ७३, हि.नं. ९ च्या जागेवरील बांधकामाचे प्लॅन.

महाशय,

उपरोक्त संदर्भिय विषयाचा आपला अर्ज पोहचला. सदर प्रकरणी या कार्यालयाची मासिक सभा दिनांक २/८/८९ चा ठराव क्र. ३/अ/१६ अन्वये खालील शर्तींना बंधन कारक ठेवून परवानगी देण्यात येत आहे.

१) आपल्या बांधकामाबाबत शेजारील / हित संबंधित यांच्या तक्रारी येता कामा नये व तुमचे संबंधितानी तक्रारी केल्यास त्याचे निवारण तुम्हस तुमचे स्वत:चे खर्चाने करावयाचे आहे. त्यास पचायत जबाबदार राहणार नाही.

१) अ) आपण दाखल केलेल्या प्लॅन प्रमाणे बांधकाम करणेत हरकत नाही.

२) बांधकाम प्रत्यक्ष सुरु करतेवेळी ग्रामपचायतीस लेखी कळविले पाहिजे.

३) आपली सकल्पीत इमारत तयार झाल्यानंतर इमारतीच्या सांडपाण्याची व्यवस्था स्वतचे जागेत किंवा तुमच्या इमारतीपासून ते पंचायतीच्या मेन गटारापर्यंत तुम्ही तुमच्या स्वत:च्या खर्चाने करावयाची आहे.

४) नियोजित बांधकामाच्या नकाशास (अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कल्याण सकुलन व (ब) नगर रचना कार्यालय, (टाउन प्लॅनिंग) ठाणे यांचेकडून मंजुरी घेण्याची जबाबदारी आपली आहे.

५) सदरचा परवानगी घेतल्यापासून बांधकाम एका वर्षात सुरु झाले नाही, तर परवानगीचे नुतनीकरण करून घेणे आपणांवर बंधनकारक राहील.

६, आपल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वास्तू शास्त्रज्ञ (अर्कीटेक्ट) यांचा मूल्यांकन दाखला (व्हॅल्यूएशन सर्टिफिकेट) या कार्यालयांत सादर करावा.

कृपया मागे पहा